681/2023

14 / 36

पुनर्विकासकास राहील.लिहून घेणार हे लिहून देणार यांना देण्यात येणा–या सदनिकांचे वाढीव क्षेत्रफळ हे पुढीलप्रमाणे असेल.

अनु. क्र.	सदनिका धारकांचे नांव	१२ टक्के वाढवून देण्यात येणारे चटई क्षेत्रफळ + अस्तित्वात असलेले चौ. फूट. क्षेत्रफळ.	एकूण क्षेत्रफळ चौ. फूट. (बिल्टअप)
१	श्री. समाधान शिवाजी बागराव	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
२	श्रीमती. दिपश्री हरी पवार	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
३	श्री. सुरेश तानाजी कदम	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
४	श्री. राहुल रविंद्र जाधव सौ. राशी राहुल जाधव	३१८.६४ चौ. फूट.	३५०.५० चौ. फूट.
५	श्री. राजेंद्रकुमार रामलाल श्रीवास्तव	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
६	श्रीमती. कुंदा विठोबा भुजबळ	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
७	पुनम चंदनकुमार साव	३२२.५६ चौ. फूट.	३५४.८१ चौ. फूट.
८	श्री. महादेव कवडूजी बिनेकर सौ. नलिनी महादेव बिनेकर	५६३.१९ चौ. फूट.	६१९.५१ चौ. फूट.
९	श्री. सिलनकुमार डे (मयत) यांचे कायदेशीर वारस श्रीमती. सुमित्रा एम. डे	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
१०	सौ. स्मिता सुधिर गडकरी श्री. सुधिर एम. गडकरी	५२३.६८ चौ. फूट.	५७६.०४ चौ. फूट.
११	श्री. रत्नाकर अरखित बिसवाल	५७२.९५ चौ. फूट.	६३०.२४ चौ. फूट.
१२	श्री. अनिल भिकाजी जाधव (मयत) यांचे कायदेशीर वारस श्रीमती. अस्मिता अनिल जाधव	४४३.०४ चौ. फूट.	४८७.३४ चौ. फूट.
१३	श्री. हरीशचंद्र बाबू साळूंके (मयत) यांचे कायदेशीर वारस सुनिल हरीचंद्र साळूंके व प्रविण हरीचंद्र साळूंके	४८३.९९ चौ. फूट.	५३२.३८ चौ. फूट.
१४	श्री. राजेंद्रकुमार रामलाल श्रीवास्तव सौ. गीता राजेंद्र श्रीवास्तव	४९९.६६ चौ. फूट.	५४९.६२ चौ. फूट.
	एकूण क्षेत्रफळ	६३९५.९५ चौ. फूट.	७०२४.४८ चौ. फूट

टहन - ४
१४८००० | २०२३
२० | ८०

TNN(R)/681/2023
Page/ 15 / 36

४. लिहून देणार हे त्यांच्या सदनिकांचा ताबा हा लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीचा पुर्नविकासनाचा बांधकाम आराखडा मंजूर झाल्यानंतर दोन महिन्यांच्या कालावधीत देतील. व लिहून घेणार हे लिहून देणार यांना सदरहू मिळकतीचा पुर्नविकासनाचा बांधकाम आराखडा मंजूर झाल्यानंतर ३ वर्षात (३६ महिन्यात) सर्व सुख सुविधा सह इमारत पुर्नविकासीत करून नवीन सदनिकांचा ताबा देतील. तसेच सदरहू मुदतीमध्ये कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यास सदरहू नैसर्गिक आपत्तीचा कालावधी हा नमूद मुदतीमध्ये धरला जाणार नाही, व भविष्यात कोणत्याही कारणामुळे सदरहू मुदत वाढवायची असल्यास लिहून घेणार हे लिहून देणार यांची भेट घेवून चर्चाविनीमय करून त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल, हे दोन्ही उभयपक्षियांना मान्य व कबुल आहे. तसेच भविष्यामध्ये सदरहू मिळकतीच्या मालकी हक्कावरून कोणीही हरकत, अडथळा उपस्थित केल्यास, दावा, वाद–विवाद दाखल केल्यास त्याचे संपूर्ण निराकरण हे लिहून देणार स्वखर्चाने करतील. व ती त्यांचीच जबाबदारी राहील. तसेच सदरहू हरकत, अडथळा उपस्थित केल्यास, दावा, वाद–विवाद निराकरण करण्यासाठी लागणारा कालावधी हा सदरहू दिलेल्या मुदतीत धरला जाणार नाही.

५. सदरहू मिळकतीचा पुर्नविकसनाचा बांधकाम आराखडा हा लिहून घेणार हे कुळगाव बदलापूर नगर परिषदेमध्ये अधिमुल्याची /प्रिमियमची /अँन्सीलरी पुरकची रक्कम तसेच हस्तांतरणीय विकास हक्कची रक्कम भरल्यानंतर स्वखर्चाने पुर्नविकसनाचा बांधकाम आराखडा मंजूर करून घेतील व त्यासंबंधी लागणारे आवश्यक ते सर्व सहकार्य, सह्या, जाबजबाब इ. लिहून देणार हे लिहून घेणार यांना देतील.

६. लिहून देणार यांच्या लाभात देण्यात येणा–या सदनिका नावे करण्याकामी येणा–या स्टॅम्प डयुटी, नोंदणीखर्च, जीएसटी हे लिहून घेणार करतील. परंतु कदाचित त्यांचे अतिरिक्त क्षेत्रफळ सदनिकामध्ये असल्यास त्यांची अतिरिक्त स्टॅम्पडयुटी व रजिस्ट्रेशन फी ह्यांचा सर्व खर्च इमारतीत सदनिका धारक सदस्य करतील.

७. लिहून देणार हे लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीचा पुर्नविकास होण्याकामी त्यांच्या ताब्यात असलेल्या जागेचा ताबा देतील व त्याकामी लिहून घेणार हे लिहून देणार यांना एकुण २ (१ रूम किचन) साठी प्रति महिना रू. ५,०००/– (अक्षरी रक्कम रूपये

N M Binekar
A A Jadhav
15/12/23

681/2023
16 / 36

पाच हजार रूपये मात्र) व **एकुण** १ (१ बेडरूम, हॉल व किचन) साठी प्रति महिना रू. ५,५००/– (अक्षरी रक्कम रूपये पाच हजार पाचशे मात्र) **एकुण** ३ (१ बेडरूम, हॉल व किचन व टेरेस) साठी प्रति महिना रू. ६,०००/– (अक्षरी रक्कम रूपये सहा हजार मात्र) याप्रमाणे ६ महिन्यांचे आगाउ भाडे याकरीता ६ महिन्यांचे आगाउ चेक सदनीका धारकांच्या नावे देण्यात येतील. प्रत्येक सदनिकेसाठी देण्यात येणारे भाडे हे प्रत्येक वर्षी १०टक्के या प्रमाणे वाढवून देण्यात येईल. लिहून देणार यांनी पर्यायी व्यवस्था म्हणून जागेचा शोध स्वत: करावयाचा आहे. लिहून घेणार हे लिहून देणार यांना भाडयापोटी देत असलेल्या रक्कमेत कोणत्याही स्वरूपात वाढ केली जाणार नाही. तसेच लिहून देणार यांनी त्यांच्या सदनिकेचा ताबा लिहून घेणार यांना ज्या दिवशी देतील त्या दिवसापासुन लिहून घेणार हे लिहून देणार यांना भाडयाच्या स्वरूपात रक्कम देतील. ताबा दिल्यानंतर भाडे चालू होईल हि बाब उभयपक्षीय मान्य करतात.

८. **लिहून घेणार यांनी लिहून देणार यांस सदरची मिळकतीत** सदयस्थितित पुनर्विकासक यांनी **प्रस्तावित इमारतीत लिहून घेणार व लिहून देणार यांच्यामध्ये आपापसात** ठरविल्याप्रमाणे **व आपसी समझोत्याने कोणत्याही प्रकारचा रोख मोबदला, कॉर्पोस फंड, ब्रोकरेज शुल्क, अमानत रक्कम (डिपॉझिट) व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त क्षेत्राचे शुल्क लिहून घेणार हे लिहून देणार यांना देण्यात येणार नाही आहेत.**

९. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस सदरहू मिळकतीचा ताबा देण्यापूर्वी लिहून देणार यांच्या सदनिकांचे लाईट बील, नगरपालिकेची कर यांची थकबाकी ठेवायची नाही. तद्नंतर सदर मिळकतीचा ताबा लिहून घेणार यांना दिल्यानंतर येणारे सर्व लाईट बील, नगरपालिकेचे कर भरण्याची जबाबदारी लिहून घेणार यांची राहील. लिहून देणार हे अशी हमी देतात की, सदरच्या सदनिका मिळकतीचे अद्यतागायत असणारे कर व इतर काही थकबाकी असल्यास ती आपल्या स्वत:च्या प्रदेर खर्चाने भरतील. त्याची झळ लिहून घेणार यांना लागु देणार नाहीत.

उहन - ४
दस्त क्र. १४७०८ / २०२३
पान २२ / ८७

१०. सदरहू नवीन इमारतीमधील लिहून घेणार यांच्या हिस्स्यास नव्याने बांधण्यात आलेल्या सदनिका लिहून घेणार /विकासक हे कुठल्याही ग्राहकास विकतील व या विक्रीस लिहून

Maitrayee R. N M Sinekar 14/12/23 M J N A A Jadhav

ADJ1(L)/68/2023
Page/ 17 /36

देणार यांची कुठलिही हरकत असणार नाही. तसेच नवीन सदनिका खरेदीदार यांना संस्थेचे सभासद करून घेण्यासाठी येणारा खर्च व कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी लिहून घेणार यांची असेल व त्यासाठी लिहून देणार ही गृहनिर्माण संस्था त्यांच्या परिने योग्य ते सहकार्य करतील.

११. लिहून घेणार यांनी सदरहू मिळकतीचे पुर्नविकसनाचे काम पूर्ण झाल्यानंतर नविन सदनिकांचे खरेदीखत त्या त्या सदनिकाधारकांच्या नावे त्वरीत करून दयावयाचे आहे, व सदरहू सदनिकांचा ताबा हा सदनिका धारकांना दयावयाचा आहे.

१२. लिहून घेणार व लिहून देणार यांच्यामध्ये असे ठरलेले आहे की, सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणा–या नविन इमारतीमध्ये नगरपालिकेच्या नियमांनुसार पार्किंग देणे पुर्नविकासक यांच्यावर बंधनकारक राहिल व सदर पार्किंग वर जून्या व नविन संस्थेच्या सभासदांचा समान अधिकार राहील.

१३. लिहून घेणार/विकासक हे सदरहू गृहनिर्माण संस्थेचा पुर्नविकास करताना त्यांची जाहिरात करण्यासाठी संस्थेच्या जागेवर आपल्या नावाचा फलक लावतील व त्यास लिहून देणार यांची कुठल्याही स्वरूपाची हरकत असणार नाही व लिहून घेणार समझौता करारनामा झाल्यावर लिहून घेणार हे आपल्या वकिलामार्फत वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देतील त्याकरिता संस्था कोणत्याही प्रकारची हरकत घेणार नाही.

१४. लिहून देणार हे सदर पुर्नविकसन कराराद्वारे असे लिहून देतात की, लिहून देणार हे त्यांच्या हयातीत व त्यांच्या मृत्यूपश्च्यात त्यांचे वालीवारस हे लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीच्या पुर्नविकसनासंदर्भात आवश्यक ते सर्व सहकार्य करतील तसेच आवश्यक ते सर्व कागदपत्रांवर सहया, जाबजबाब इ. देतील.

टहन - ४
३८००७ / २०२३
२३ / ६०

उभयपक्षीयांमध्ये असे ठरलेले आहे की, लिहून घेणार हे सदरहू प्रकल्प हे रेरा कायदयाअंतर्गत नोंदणीकृत करून घेतील, तसेच त्यासंबंधी लागणारे आवश्यक ते सर्व सहकार्य, सहया, जाबजबाब इ. लिहून देणार हे लिहून घेणार यांना देतील. तसेच रेरा कायदयाअंतर्गत लिहून देणार यांना प्रदान करण्यात आलेल्या सदनिकांसाठी लिहून देणार

N M Binekar
A A Jadhav
14/12/23

KDJ/T(R) 681 /2023
Page/ 18 / 36

लिहून घेणार यांच्या बरोबर सदरहू रेरा कायदयाअंतर्गत आवश्यकता भासल्यास नोंदणी करून घेतील.

१६. सदरहु मिळकतीचा मोबदलाचा भरणा वरील पध्दतीने लिहुन घेणार यांचेकडुन लिहून देणारयांना पुर्णपणे मिळाल्यावर सदरहु मिळकतीचे अंतिम खरेदीखत वा खते लिहुन घेणार सांगतील त्यावेळी सदरहु मिळकतीमधील नियोजित इमारतींमधील फ्लॅट्स धारकांचे सोसायटीचे नांवे करून ते नोंदवुन देण्यास लिहून देणार तयार असून लिहुन घेणारांना कबुल व बांधील आहेत.

१७. लिहुन देणार असे जाहीर करतात की, सदरहु मिळकत ही लिहुन देणार यांची मालकी हक्काची असुन सदरहु मिळकत ही लिहुन देणार यांच्या प्रत्यक्ष कब्जावहीवाटीची आहे. तसेच तीचे टायटल हे चोख व मार्केटेबल असे स्वच्छ आहे. तसेच सदरहु मिळकत ही लिहुन देणार यांच्या मालकी हक्काची व कब्जावहिवाटीची असल्याने अन्य कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क सत्ता संबंध नाही. अशा सदरहु मिळकती विकसीत करणे वसदरहु मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण अधिकार लिहुन देणार यांना आहे. सदरहु मिळकतीवर कोणाचाही कोणताही स्वरुपाचा बोजा नाही अशी ही बोजाविरहीत निर्विवाद सदरहु मिळकत लिहुन देणारांनी लिहुन घेणारांना विकसीत करण्यासाठी दिलेली आहे. लिहुन देणार असे जाहीर करतात की, सदरहु मिळकतीचा मालकी हक्क व कब्जावहीवाट ही लिहुन देणार यांची असुन लिहुन देणारांनी लिहून घेणार यांच्या व्यतिरिक्त सदरहु मिळकतीच्या बाबतीत वा तीच्या कोणत्याही स्वरुपाचा कोणाही व्यक्तिशी वा संस्थेशी लेखी वा तोंडी करार केलेला नाही किंवा सदरहु मिळकत वा तिचा कोणताही भाग अन्य कोणासही भाडयाने दिलेली नाही की गहाण, दान, तारण वा बक्षीसाने दिलेली नाही तसेच सदरहु मिळकतीवर वा तिचे कोणत्याही भागावर बोझा नाही. असल्याचे आढळून आल्यास त्याचे निराकरण वा निवारण करुन देणेस लिहुन देणार तयार असुन लिहुन घेणारांना बांधील आहेत. लिहुन देणार असे जाहीर करतात की, सदरहु मिळकतीसंबंधी वा तिच्या कोणत्याही संदर्भात लिहुन देणार यांना आजपावेतो राज्यशासन, निमसरकारी वा सरकारी संस्था यांजकडून कोणत्याही स्वरुपाची सुचना, हुकूम वा नोटीस मिळालेली नाही तसेच सदरहु मिळकत ही कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाने बाधीत नाही.

Maitrayee
N M Binekar
M Joshi
A A Jadhav

१८. सदरहु मिळकत पुर्नविकसीत करणेकामी लिहुन घेणार यांनी सदरहु मिळकतीचा सोईचा असा नियोजित इमारतीचा आराखडा हा कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांच्याकडून मंजुर करुन घ्यावयाचा आहे. व भविष्यामध्ये सदरहू पुर्नविकसन बांधकाम आराखडयांमध्ये दुरुस्त्या, रिव्हीजन करणेकामी गरज भासल्यास सदरहु मिळकतीवरील नियोजित इमारतीच्या मंजुर आरखडयामध्ये काही दुरुस्त्या करुन सुधारीत बांधकाम परवानगी तसेच सदरहु कामी ज्या काही परवानग्या आवश्यक असतील त्या त्या परवानग्या लेखी जाबजबाब लागतील ते ते सर्व काही लिहुन घेणारांनी आणुन घेण्याचे कबुल केले असुन ते आणतांना लिहुन देणार हे त्यांचे सर्व प्रकारचे सहकार्य तसेच संमती वा नाहरकत हे लिहुन घेणारांना अथवा कुळगांव बदलापूर नगरपरिषदेस प्रदान करतील. अथवा ती सर्व कामे लिहुन घेणारांनी लिहुन देणारांचे कुलमुखत्यारी म्हणुन करण्याची आहेत, त्यासाठी आवश्यक असे ईरिव्होकेबल जनरल पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी हया करारनामाचा पुरक दस्त म्हणुन लिहुन देणार लिहुन घेणार यांच्या लाभात करून देतील. मात्र त्याकामी होणारा सर्व खर्च हा लिहुन घेणारांनी करणेचा आहे.

१९. सदरहु मिळकतीचा मंजूर आराखडयानुसार व बांधकाम परवानगीनुसार कायदेशिरित्या सदरहू मिळकतीवर इमारतीचे बांधकाम लिहून घेणार यांनी सुरु करावयाचे आहे. त्यासाठी स्वतःच्या पदरखर्चाने सक्षम वास्तुशिल्पकार नियुक्त करुन त्याप्रमाणे गरजेनुसार संबंधीत खात्याकडुन मंजुरी मिळवणे तसेच तद्नंतर सदरहु मिळकतीवर बांधण्यात यावयाच्या इमारतीचा इमारत आराखडयानुसार बांधकाम सुरु करणे, आदी कामे करताना वरील परवानग्या संबंधीत खात्यांकडुन मिळवतांना सदरहु खात्यामध्ये लिहुन देणारांचेवतीने काम करणे, कागदपत्र पुरवणे, जाबजबाब देणे, साक्षीपुरावे देणे, तेथे लिहुन देणारांचे प्रतिनिधीत्व करणे आदी सर्व कामे करावे लागतील, ही लिहुन देणारांचे प्रतिनिधी म्हणुन लिहुन घेणारांनी करण्याचे आहेत. त्यासाठी स्वतंत्र असे कुलमुखत्यारनामा हा लिहुन देणार लिहुन घेणारांना देत आहे. मात्र सदरहु मिळकतीवर नियोजित इमारतीची कामे, बांधकाम ही लिहुन घेणारांना विधिवत करावयाची आहेत.

Maitrayee
Jadhav
N M Binekar
M J Vasu
A A Jadhav

ADJ/T(R) 681/2023
Page / 21 / 36

२०. सदरहू मिळकतीच्या टायटल बाबत तसेच कब्जाबाबत लिहून देणार यांच्या तर्फे कोणीही वाद निर्माण केल्यास त्याचे निराकरण लिहून देणार हे स्वखर्चाने करून घेतील व लिहून घेणार यांना सदरहू मिळकत योग्यरित्या विकसीत करता यावी त्या योजनेसाठी जरूर ते कागदपत्र अस्सल नकला व माहिती वगैरे लिहून देणार यांनी दयावयाची आहे. तसेच जे जे कागदपत्र मिळणार नाहीत ते मिळविण्यासाठी लिहून देणार यांनी सहया वगैरे देवून सहकार्य करावयाचे आहे.

२१. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस सदरहू मिळकतीचा निर्वीवाद कब्जा कराराच्या अशोक पुर्ततेकरीता दिलेला आहे व लिहून घेणार यांना जागेवर जाण्यायेण्याचे व सदरहू मिळकतीची प्रायव्हेट सर्व्हेअर अगर सरकारी कार्यालयाकडून पाहणी व मोजणी करण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे तसेच सदरहू मिळकतीस लिहून घेणार यांना कुंपण किंवा कुपणाची भिंत घालण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे व अशी मोजणी करतांना किंवा कुपणाची भिंत बांधतांना काही कायदेशिर अडचणी किंवा तक्रारी आल्यास किंवा अशा अडचणी किंवा तक्रारी बाबतची नोटीस लिहून घेणार यांस मिळाल्यास लिहून देणार त्या ताबोडतोब स्वखर्चाने दूर करतील व त्याची तोशिस लिहून घेणार यांस लागू देणार नाहीत. सदरहू मिळकत विकसीत करण्याचे व विकसन कार्यपूर्ण करण्याच्या दृष्टीने त्या जागेवर त्यांचे प्रतिनिधी अभियंता, वास्तूशिल्पकार, कायदेशिर सल्लागार वगैरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी मित्र, आप्त नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसनाचे कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील त्यास लिहून देणार यांनी कोणतीही हरकत घेण्याची नाही.

टहन - ४
दस्त क्र. ९४००/ २०२१
पान २६ / ८७

२२. सदरहू मिळकतीवर लिहून घेणार यांच्या नावाचा बांधकाम योजना दर्शविणारा नामफलक लावण्याचा हक्क लिहून घेणार यांस लिहून देणार यांनी दिला आहे. तसेच लिहून घेणार हे सदर बांधकाम योजने अंतर्गत बांधण्यात येणा-या निवासी सदनिका (लिहून देणार यांना देण्यात येणारे बांधकाम क्षेत्र वगळून) विक्री करण्याचा तसेच विक्रीची किंमत घेण्याचा विल्हेवाट लावण्याचा पूर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिला आहे त्यासंबंधी होणा-या व्यवहारा अंतर्गत लिहून देणार हे कोणत्याही प्रकारची हरकत घेणार नाहीत.

N M Binckar
Maitrayee
A A Jadhav

681/2023
Page / 9 / 19

२३. लिहून घेणार हे लिहून देणार यांना जी सदनिका देणार आहेत. त्या सदनिकेमध्ये सुविधा म्हणजेच ॲमिनिटीज इतर सदनिकाधारकांना ज्याप्रमाणे दिल्या असतील त्याप्रमाणे लिहून देणार यांना देखील दिल्या जातील. सदरहू आधुनिक सुख सुविधा (ॲमिनिटीज) दिनांक ..../..../.......... रोजीचे पत्र लिहून घेणार हे लिहून देणार यांना दिलेले आहे त्यानुसार सर्व आधुनिक सुख सुविधा (ॲमिनिटीज) लिहून घेणार हे लिहून देणार यांना देतील. सदरहु सदनिकांच्या व इमारतीच्या सुख सुविधा पुढील प्रमाणे आहेत.

ॲमिनिटीजचा तपशील खालीलप्रमाणे:—

१. सर्व सदनिकाधारकांना १२टक्के अतिरिक्त कार्पेट एरिया देण्यात येईल.

२. सर्व सभासदांना मासिक भाडे १ रूम किचन साठी रू. ५,०००/—, १ बेडरूम, हॉल व किचनसाठी रू. ५,५००/, १ बेडरूम, हॉल व किचन व टेरेससाठी रू. ६,०००/— प्रति महिन्याचे भाडे आगाऊ देण्यात येईल.

३. प्रत्येक बिल्डिंगसाठी वेगळी पाण्याची टाकी असेल.

४. संपूर्ण इमारतीची रचना वास्तुशास्त्राप्रमाणे असेल.

५. cctv कॅमेराची व्यवस्था संपूर्ण सोसायटीसाठी असेल. हे कॅमेरे नाईट व्हिजन असतील.

६. इमारतीची रचना ही ठुबनपा च्या नियमानुसार असेल. व नकाशा परवानगी घेण्यात आपणांस दाखविण्यात येईल.

७. संपूर्ण इमारतीचे काम बांधकाम परवानगी मिळाल्यापासून ३० ते ३६ महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

८. इमारतीला डिझायनर इंट्रंन्स लॉबी देण्यात येईल.

९. बिल्डिंगच्या बाहेरील बाजूस टेक्चर पेंट वापरण्यात येईल.

१०. इमारतीसाठी फायर फिटींगची सुविधा असेल.

११. कॉम्प्लेक्ससाठी बोरिंगची सोय असेल.

१२. इमारतीची रचना भुकंप प्रतिरोध असेल. तसेच कॉंक्रिट हे M—२०/ M—२५ आणि स्टिल बार हे TMT ग्रेडचे असेल.

१३. इमारतीचे बांधकाम विटांनी केले जाईल.

१४. सर्व ॲमेनिटिज व पार्किंगची सुविधा नविन मेंबर्स प्रमाणेच जुन्या मेंबर्सना देण्यात येतील.

१५. इमारतीसाठी लिफ्ट देण्यात येईल.) तसेच पावर बॅकअप देण्यात येईल. (लिफ्ट OTIS/Sindler or other equivalent brand ची देण्यात येईल.)

१६. इमारतीच्या टेरेसवर वॉटरप्रुफिंग करून चिप्स बसवून देण्यात येईल.

१७. इमारतीच्या टेरेसवर पत्र्याची शेड बसवून देण्यात येईल.

१८. पेवर ब्लॉक बसवून देण्यात येईल. व मोकळया पीरसरात बाक बसवून देण्यात येईल.

१९. इमारतीत आग प्रतिबंधक कॉपर वायरिंग होईल.

२०. सोसायटी ऑफिस बनवून देण्यात येईल.

२१. ओपन पार्किंग देण्यात येईल.

२२. सिक्युरिटी कॅबिन देण्यात येईल.

२३. Rain Water Harvesting करून देण्यात येईल.

... 681/2023
Page / 72 - 136

२४. जुन्या आणि १२टक्के वाढीव कार्पेट एरियाच्या रेजिस्ट्रेशनचा खर्च करून देण्यात येईल.

अंतर्गत सुविधा:—

१. घरात Aisan /Berger वापरण्यात येईल.
२. कीचन फ्लॅटफॉर्मला ग्रॅनाईट असेल. सिंक स्टेनलेस स्टिलचे असेल.
३. सर्व रूमला फलोरिंग २x२ (विट्रिफाईड) च्या टाईल्स देण्यात येईल.
४. किचन बाथरूम व WC मध्ये आणि Passage मध्ये फुल टाईल्स असतील.
५. घराकला फ्रेंच विंडो (ग्रेनाईट) असतील व (हॉल व बेडरूम —४ track, — किचन —२ track — नेट track बसवून देण्यात येईल. पावडरकोटेड अल्युमिनिअम फ्रेम सहीत)
६. सर्व सदनिकांच्या बालकनीस पुर्ण ग्रील असतील.
७. घरात इन्वर्टर पॉईंट तसेच बेडरूम व हॉलसाठी AC पॉईट देण्यात येईल.
८. हॉलमध्ये जिप्सम POP करून देण्यात येईल.
९. किचनसाठी एक्झोससाठी पॉईंट देण्यात येईल.
१०. इलेक्ट्रिक स्विचेस, वायरिंग, फ्रिज, वाशिंग, मशिन, अक्वागार्ड पॉईंट व बाथरूमचे नळ उच्च प्रतिचे असतील.
११. प्रत्येक सदनिकेत ७०० लिटर्सची सिंटेक्स ची टाकी देण्यात येईल.
१२. बाथरूम व WC चा दरवाजाची फ्रेम मार्बलची असेल. व विंडो (ग्रेनाईट) असतील बॅकेलयीट दरवाजा असेल.
१३. बोअरवेल व कुबनपा पिण्याचे पाणी हे दोन्हीही कनेक्शन किचनमध्ये देण्यात येतील.
१४. सेफ्टी डोअर बसवून देण्यात येईल.
१५. किचन मध्ये लॉफट बसवून देण्यात येईल.
१६. ज्या सदनिकाधारकांचे गॅस (पाईपलाईन) कनेक्शन असेल. त्यांना पुर्नजोडणी करून देण्यात येईल.

विशषे टिप्पणी:—

१. विकासक कन्व्हेन्स डिड करून देतील.
२. सदनिकेच्या एक्स्ट्रा कार्पेट एरियाच्या रजिस्ट्रेशनसाठी लागणारे चार्जेस सदनिका धारकाने दयावे. (एक्स्ट्रा कार्पेट एरियाची रक्कम सदनिका धारक महारेरा नमुद Payment Shedule प्रमाणे देतील. त्यात कोणतही विलंब करणार नाहीत ती रक्कम थकविलयास देण्यात येणा—या भाड्याची रक्कम थांबविण्यात येईल.)
३. सोसायटीने बांधकाम सुरू करण्यापूर्वी लाईट बिल व पाणी बिल सदनिकाधारक क्लिअर करतील व सोसायटी ताब्यात देताना विकासक लाईट व पाणी बिल क्लिअर करतील.

टनन-४
दस्त क्र. ९४६०७ २०२३
७२ / ८०

२४. इमारतीच्या सदनिका धारक सदस्याचे प्रॉपर्टी टॅक्स/इलेक्ट्रिक मीटर बिल/मेन्टनन्स तसेच बँकेचे लोन/हफ्ते/सावकारी कर्ज/पतपेढी कर्ज किंवा अन्य कोणताही स्वरूपाचे कर्ज असेल ते क्लिअर करून देण्याची जबाबदारी इमारतीतील सदनिका धारकांची असेल.

N M Binekar
Maitrayeeale
A A Jadhav

ADJ/WTR 68/2023
Page / 23 /36

२५. पुर्नविकास करारनामा रजिस्ट्रर केल्यावर किंवा समझोता करारनामा झाल्यावर तांत्रिक किंवा कायदेशिर बाब समोर आल्यास दोन्ही पक्ष सहमतिने सर्व समस्याचे निराकारण करतील.

२६. इमारतीच्या आराखडाप्रमाणे आपल्या ७/१२ वरिल जमिनिच्या क्षेत्रफळानुसार जो एफ. एस. आय मिळेल त्याच प्रमाणे लिहून देणार यांना १४ सदनिका मोजमापाप्रमाणे देण्यात येईल हे सर्व सदनिकाधारक सदस्यांच्या सहमतिने चर्चा करून ठरविले आहे. त्यांच्या व्यतिरिक्त मे. साईराज कंस्ट्रक्शन हयांनी टी. डी. आर/प्रिमिअम टी. डी. आर नगरपालिकेकडुन विकत घेवुन पुर्नविकास इमारतीच्यावर डेव्हलप करण्याकरीता अतिरिक्त वाढीव क्षेत्रफळाचा वापर करणार आहेत. त्याबाबत संपुर्ण कल्पना व माहिती सोसायटीच्या सदनिकाधारक सदस्यांना दिली आहे व त्यांस सर्वानुमती सहमती आहे. त्याबाबत "ओम गुरूकृपा को. ऑप. हौ. सोसायटी लि." कोणीही सदस्य हरकत घेणार नाही. तसे झाल्यास "ओम गुरूकृपा को. ऑप. हौ. सोसायटी लि." सोसायटीचे सदस्य त्यांचे निराकरण करतील.

२७. "ओम गुरूकृपा को. ऑप. हौ. सोसायटी लि." चे १४ सदनिकाधारक यांना ताबा दिल्यावर उर्वरित कोणत्याही ब्लॉकवर तसेच वाढीव एफ. एस. आय. व त्यात झालेल्या कोणत्याही बदलावर "ओम गुरूकृपा को. ऑप. हौ. सोसायटी लि." त्यांचा अधिकार सांगणार नाही किंवा हरकत घेणार नाही व सोसायटीस दिलेल्या सदनिका विक्री करारनाम्यावर कोणतीही हरकत घेणार नाही.

२८. "ओम गुरूकृपा को. ऑप. हौ. सोसायटी लि." सदनिकाधारकांना दिलेल्या ॲमिनिटीज व्यतीरिक्त अतिरिक्त काम करावयाचे असल्यास त्यांच्या अतिरिक्त चार्ज दयावे लागेल.

२९. लिहून देणार हे अशी हमी देत आहेत की, लिहून देणार हे या करारानंतर सदर मिळकतीसंबंधी इतर कोणत्याही त्रयस्त इसमासोबत वा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करार मदार करणार नाही.

ADJT(R) 681/2023
Page / 24 / 56

३०. लिहून देणार हे अशी हमी देतात की, सदरच्या मिळकतीसंबंधी कोणत्याही न्यायालयात दावा वैगरे चालू नाही तसेच सदरची मिळकत ही वादाचा विषय नाही. तसेच जर वाद वैगरे उपस्थित झाल्यास तो मिटवून देण्याची जबाबदारी लिहून देणार हयांचीच राहील. अशी हमी देत आहेत.

३१. लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सर्वतोप्रकारचे सहकार्य देणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकता लागेल त्यावेळी उपस्थित राहून आवश्यक तो दस्त लिहून दयावयाचा आहे.

३२. लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीवर विकसन कार्य राबविण्याकरीता महाराष्ट्र स्थावर संपदा (विनीयम व विकास) कायदा २०१६, (महारेरा) महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट १९६३, महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट १९७०, महाराष्ट्र को. ऑप. सोसायटीस ॲक्ट १९६० व शासनाने निर्देशित केलेल्या अन्य कायदया अंतर्गत लागणा–या सर्व तरतुदींची पूर्तता करण्याचे हक्क व अधिकार आहे व राहील. लिहून घेणार यांना विकसन कार्य व त्याअंतर्गत होणा–या सदनिका व गाळयांची विक्रीवरील कोणत्याही कायदया अंतर्गत राबविण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे.

३३. सदरहू मिळकतीचा लिहून देणार यांस जो मोबदला प्राप्त होणार आहे, त्याकरीता आयकर कायदयाअंतर्गत जो काही कर भरावा लागेल तो लिहून देणार यांनी भरण्याचा आहे.

टहन - ४	
९४०००	२०२३
३०	८७

३४. उभयपक्षीयांत असे ठरले आहे की, सदरहू मिळकतीचे विकसीत कार्य योग्यरित्या राबविण्याकरीता जर लिहून घेणार यांना वित्त संस्था/बँका यांच्याकडून कंन्स्ट्रक्शन लोन, ॲडवान्सेस, इतर कर्ज सवलती देण्याच्या अनुषंगाने सदरहू मिळकतीवर बांधकाम करण्यात येणारे बांधकाम (लिहून देणार यांना देण्यात येणारे बांधकाम क्षेत्र वगळून) वित्त संस्थेकडे तारण गहाण ठेवण्याचा पूर्ण हक्क व अधिकार आहे व अशा तारण, गहाण ठेवलेल्या मिळकती सोडवून घेण्याचा व वित्तसंस्थेकडून घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज पूर्णपणे फेडण्याची जबाबदारी लिहून घेणार यांचीच आहे व राहील व त्याची तोशिस लिहून देणार यांना लिहून घेणार हे लागू देणार नाहीत, परंतु करारात ठरलेल्या प्रमाणे मोबदला

N M Binekar Maitrayee M J A A Jadhav

ADJ/T(R)/681/2023
Page/ 25 /36

फरोक्तखतापूर्वी लिहून घेणार यांनी लिहून देणार यांच्या मिळकतीचा मोबदला देणे बंधनकारक राहील. लिहून घेणार असे जाहिर करून हमी देतात की, लिहून देणार यांना सदरहू कराराअंतर्गत देण्यात येणारा वास्तूस्वरूपी मोबदला हा सदरहू तारण, गहाण आणि, अथवा वित्त संस्थेच्या बोज्याच्या अंतर्गत भाग राहणार नाही. लिहून घेणार यांनी वित्तसंस्थेकडून प्राप्त केलेले कर्ज व सवलती हे त्यांव्यापरीने व्याजासह परत करतील व अशा कर्ज व सवलतींकरीता लिहून देणार यांना प्राप्त होणा-या मोबदल्यावर कोणत्याही प्रकारे टाच, जप्ती येणार नाही, याची दक्षता घेतील व त्याची तोशिस लिहून देणार यांना लागू देणार नाहीत, याची स्पष्ट खात्री लिहून घेणार हे लिहून देत आहेत.

३५. उभयपक्षीयांत असे ठरलेले आहे की, सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणा-या इमारतीतील गाळे/सदनिका (लिहून देणार यांना देण्यात येणारे बांधकाम क्षेत्र वगळून) हव्या त्यांच्या मर्जीप्रमाणे विकण्याचा व त्यांची विल्हेवाट लावण्याचा अधिकार असेल व राहील.

३६. विकसीत कार्य राबवितेवेळी उभयपक्षीयांत कोणत्याही कारणाने वाद हे उपस्थित झाल्यास व विकसीत कार्य स्थगित झालेतर ज्या पक्षाने अटी व शर्तींचा भंग केला आहे त्याच्या विरोधात जरूर ती लेखी नोटीस देवून सदरहू वाद १४ दिवसांच्या आत संपुष्टात आणण्याचे आहे. व तसे न झाल्यास उभयपक्षीय सदरहू वाद लवाद कायदयाअंतर्गत सोडवून घेतील.

३७. सदरहू करारात उल्लेख केलेल्या कुठल्याही अटी व शर्तींचा योग्य तो बोध न झाल्यास व शंका निर्माण झाल्यास सदरच्या शंका / तक्रार या उभयपक्षीय यांनी एकत्र बसून सामंजस्याने विचार, विनीमय करून करून सोडवून घेण्याच्या आहेत. परंतु त्यातून योग्य निर्णय न झाल्यास सदरहू शंका/तक्रार ही लवादामार्फत उभयपक्षीय यांनी सोडवून घ्यावयाची आहे व सदरहू लवादांनी दिलेले निर्णय उभयपक्षीयांवर बंधनकारक राहील. उभयपक्षीय यांना मान्य व कबूल आहेत व राहील.

उहन-४
दस्त क्र. [illegible] ७३ / २०२३
पाने ३९ / ८८

३८. लिहून देणार व लिहून घेणार यांच्यात असे ठरले आहे की, लिहून घेणार हे सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणा-या इमारतीचा- गृहसंकूलाचा प्रोजेक्ट हा रेरा कायदयाअंतर्गत

N M Birekar
Maitrayee [illegible]
A A Jadhav
M J Vise

ADJ/T(R) 611/2023
Page/ 26/36

नोंदणी करून घेतील तसेच रेरा कायदयाच्या तरतुदींप्रमाणे लिहून देणार यांना वास्तुस्वरूपी मोबदल्याच्या अंतर्गत देण्यात येणा–या सदनिकांसाठी सह–हिस्सेदार म्हणून रेरा कायदयाच्या तरतुदीप्रमाणे सदरहू नोंदणी प्रक्रियेत समाविष्ट करून घेतील. तसेच कायदयाच्या तरतुदीप्रमाणे योग्य व आवश्यक ते सर्व जाबजबाब, नाहरकत पत्र, सहया, संमती लिहून देणार हे वेळोवेळी त्याकामी देतील.

३९. लिहून देणार व लिहून घेणार यांच्यात असे ठरले आहे की, सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणा–या गृहसंकुलातील इमारतीतील सदनिका विकताना वित्तीय संस्थेकडून, बँकांकडून वित्तीय सहाय्य घेणेकामी प्रोजेक्ट मंजूरीसाठी के. वाय. सी. (KYC) करणे आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे लिहून देणार हे त्यासाठी स्वत:च्या सहया, जाबजबाब, नाहरकत पत्र, संमती पत्र प्रदान करतील.

४०. सदरचा करार लिहून घेणार यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे तयार केलेला असून तो लिहून देणार यांनी वाचून व समजावून घेवून बरोबर असल्याची खात्री करून घेतलेली आहे व तो लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे व यातील सर्व मजकूर बरोबर याची हमी ते सदर करारादवारे आजरोजी देत आहेत.

उहन - ४
१४००७ | २०२३
३२ | ८७

वर वर्णन केलेला मजकूर हा उभयपक्षीयांनी वाचून व समजावून घेतला असून तो बरोबर असल्याचे मान्य व कबूल केलेले असून सदर मजकुर हा उभयपक्षीय यांचे स्वत:वर व त्यांचे वालीवारस, नोकरचाकर, असायनिज सोसायटीचे सदस्य हयांचेवर बंधनकारक आहे व राहील. म्हणून सदर करारावर कोणत्याही दबावाला बळी न पडता व कोणत्याही प्रकारचा नशा पाणी न करता सदर करारावर दोन साक्षीदारांसमक्ष आज दिनांक २८-१२-२३ रोजी बदलापूर येथे सहया केले असे.

प्रथम पक्षीय/ लिहून घेणार/ विकासक:–

मे. साईराज कंस्ट्रक्शन तर्फे भागीदार
१. श्री. दत्तात्रय वाळकु म्हसे

सही	अंगठा	फोटो

ADJ/T(R) 681 /2023
Page/ 97 / 96

श्री. महेश जनार्दन विशे

सही	अंगठा	फोटो

द्वितीय पक्षीय/ लिहून देणार/ संस्थेचे सभासदः–
ओम गुरूकृपा को–ऑप. हौ. सोसायटी लि. तर्फे अधिकृत सभासद

१) श्री. समाधान शिवाजी बागराव

सही	अंगठा	फोटो

२) श्रीमती. दिपश्री हरी पवार (स्वतःकरिता व संस्थेतर्फे सचिव)

सही	अंगठा	फोटो

३) श्री. सुरेश तानाजी कदम (स्वतःकरिता व संस्थेतर्फे खजिनदार)

सही	अंगठा	फोटो

४) श्री. राहुल रविंद्र जाधव

सही	अंगठा	फोटो

टहन-४
२०२३

ADJ/... /2023
Page / 15 / 86

सौ. सखी महल्ले आत्राम

सही | अंगठा | फोटो

५) श्री. राजेंद्रकुमार रामलाल श्रीवास्तव

सही | अंगठा | फोटो

६) ~~श्रीमती. कुंदा विठोबा भुजबळ~~

सही | अंगठा | फोटो

७) पुनम चंदनकुमार राव

सही | अंगठा | फोटो

८) श्री. महादेव कवडूजी बिनेकर

सही | अंगठा | फोटो

टनन - ४
९८०८/२०२३
८० / ८०

ADJ / (...) 681
Page / 29 / 86

सौ. नलिनी महादेव बिनेकर

सही | अंगठा | फोटो

N M Binekar

९) सौ. सुमित्रा एम. डे तर्फे कुलमुखत्यार धारक मैत्री डे.

सही | अंगठा | फोटो

Maitrayee de.

१०) सौ. स्मिता सुधिर गडकरी

सही | अंगठा | फोटो

श्री. सुधिर एम. गडकरी (स्वत:करिता व संस्थेतर्फे अध्यक्ष)

सही | अंगठा | फोटो

११) श्री. रत्नाकर अरखित बिसवाल

सही | अंगठा | फोटो

१२) श्रीमती. अस्मिता अनिल जाधव

A A Jadhav

Joint Sub Registrar Class II

ADJ/T(R) 681/2023
Page / 30 / 36

१३) श्री. सुनिल हरीचंद्र साळूंके

सही	अंगठा	
Salunke		

श्री. प्रविण हरीचंद्र साळूंके

सही	अंगठा	फोटो
Salunke		

१४) श्री. राजेंद्रकुमार रामलाल श्रीवास्तव

सही	अंगठा	फोटो

सौ. गीता राजेंद्र श्रीवास्तव

सही	अंगठा	फोटो
Geeta		

साक्षीदार:

१) सही.........................

नाव:– सचित सदानंद म्हसे .... वय:– २९ वर्षे

पत्ता:– इंद्रायणी निवास, मांजर्ली, बदलापुर, ठाणे ४२१५०३

२) सही.........................

नाव:– हर्षिता सेन .... वय:– ३२ वर्षे

पत्ता:– १०२, स्वामीछाया, बदलापुर (पूर्व) ४२१५०३

उ ह न – ४
दस्त क्र. ७८००७ / २०२३
३६ / ८०

PDR(R) 651/2023
Page / ५० / 56

महाराष्ट्र शासन

गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- कुळगाव (२७३६४४) | तालुका :- अंबरनाथ | जिल्हा :- ठाणे

ULPIN: 15299823181 | भूमापन क्रमांक व उपविभाग : २७/६ | 15299823181

भूधारणा पद्धती : भोगवटादार वर्ग -१ | शेताचे स्थानिक नाव :

क्षेत्र, एकक व आकारणी	खाते क्र.	भोगवटादाराचे नाव	क्षेत्र	आकार	पो ख	फेरफार क्र.	कुळ, खंड व इतर अधिकार
क्षेत्राचे एकक आर.चौ.मी	१७७७	शिवदर्शन को.ऑ.हौ. सोसायटी	६३.७७.६५	५२५६.५२		(७६३१)	कुळाचे नाव व खंड
लागवडीयोग्य क्षेत्र बिन शेती ७२.७७.७७	३२७१	ओम गुरुकृपा को ऑप हौसिंग सोसायटी लि	५.१२.३५	१२६.२८		(७७७९)	इतर अधिकार
एकूण क्षेत्र बिन शेती ५९९०.३७ आकारणी	३२७६	लक्ष्मणस्मृती को ऑप हौसिंग सोसायटी लि	३.६९.७०	३०७.५६		(७६३१)	प्रलंबित फेरफार : नाही.
							शेवटचा फेरफार क्रमांक : ७६३१ व दिनांक : १२/०५/२०२३

जुने फेरफार क्र : (...) | सीमा आणि भुमापन चिन्हे :

Collector of ... Rural

The Joint Sub Registrar Class ... | उहन - ४ | ५४००७ | २०२३ | ५० | ८७

हा गाव नमुना क्रमांक ७ दिनांक १२/०५/२०२३ रोजी डिजिटल स्वाक्षरीत केला आहे व गाव नमुना क्रमांक १२ चा डेटा अद्ययावत असल्यामुळे ७/१२ अभिलेखावर सही शिक्क्याची आवश्यकता नाही.

७/१२ डाउनलोड दि. : ... PM. वैधता पडताळणीसाठी https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dsl/ या संकेत स्थळावर जाऊन 2114... हा क्रमांक वापरावा.

ADJ/(R)/68 /2023
Page/ 32 / 36

गाव नमुना बारा (पिकांची नोंदवही)

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम २९]

गाव : कुळगाव ([illegible]) तालुका : अंबरनाथ जिल्हा :- ठाणे

भूमापन क्रमांक व उपविभाग : २६/८

			पिकाखालील क्षेत्राचा तपशील					लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन		शेरा
वर्ष	हंगाम	खाते क्रमांक	पिकाचा प्रकार	पिकाचे नाव	जल सिंचित	अजल सिंचित	जल सिंचनाचे साधन	स्वरूप	क्षेत्र	
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
					आर.चौ.मी	आर.चौ.मी			आर.चौ.मी	
२०१७-१८	संपूर्ण वर्ष							खुला प्लॉट	०.४२००	
२०१८-१९	संपूर्ण वर्ष							खुला प्लॉट	०.४२००	
२०१९-२०	संपूर्ण वर्ष							खुला प्लॉट	०.४२००	

टीप : * [illegible]

The Seal of the Collector ...

The Seal of the Joint Sub Registrar ...

उ ह न - ४
९९०० | २०२३
३२ | ६८

Ar. BHUPENDRA MHASE & ASSOCIATES

BM ASSOCIATES

Architects & Interiors

Date- 10/05/2023

TO WHOM IT MAY CONCERN

The Building known as "**Om Guru Krupa Co. Op HSG Society Ltd**" situated at Survey No-20, Hissa No-7/8, Plot No-10 at Mouje -Kulgaon, Tal- Ambernath Dist -Thane, having Area 512.35 Sq.Mtrs. approved by Kulgaon Badlapur Muncipal Council Under vide Letter No- K.B.N.P /NRV/BP/983-249 Dated - 17-12-1996

This is to certify that as per the Muncipal Plan/ Possession on site 100% FSI is utilized and there is no Balance FSI.

Date :-

Place :-

Ar. Bhupendra D. Mhase & Associates, CA/2020/118792, Badlapur

Architect Name

BD Mhase

Ar. Bhupendra D. Mhase

CA/2020/118792

03, Preshik Park, Opp. Town Planning Office, MIDC Road, Katrap, Badlapur (East)- 421 503

Mob. 9623792432 / 8149359202
arbma2020@gmail.com